स· अमळदार

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** बिलोली **Year (वर्ष):** 2022
**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0189 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/08/2022 22:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 18/08/2022
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/08/2022
**Time From (वेळेपासून):** 14:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/08/2022 **Time (वेळ):** 22:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/08/2022 22:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लिपीक श्रीमती तुडमे यांचे कक्ष, नगर परिषद बिलोली हॉल ,बिलोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
***Name of P.S.*(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. ***Complainant / Informant* (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) ***Name* (नाव):** गंगाधर जळबा कलमुर्गे
(b) ***Father's Name* (वडील चे नाव) :** जळबा
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1955 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | छोटी गल्ली बिलोली ,बिलोली ,बिल्लोळी ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | छोटी गल्ली बिलोली ,बिलोली ,बिल्लोळी ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9028551136

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती कमल पिराजी तुडमे | | वडील का नाम : पिराजी | 1. नगर परिषद बिलोली ,बिलोली ,बिल्लोळी ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 ***First Information contents*** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 18/08/2022फिर्यादी जबाबमी गंगाधर जळबा कलमुर्गे, वय 67 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त, रा.बिलोली ता.बिलोली जि.नांदेड मो.क्र9028551136समक्ष पोलीस स्टेशन बिलोली येथे हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन सन 2012 मध्ये लिपीक पदावर नगरपरिषद बिलोली येवुन सेवानिवृत्त झालो आहे. सध्या मी कुटूंबासह छोटी गल्ली, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड येथे वास्तव्यास आहे. मी दिनांक 17/08/2022 रोजी पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे हजर राहुन तक्रार दिली होती ती अशी की, माझी 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम जमा झाली नसल्याने मी दिनांक 10/08/2022 रोजी नगरपरिषद बिलोली येथे जावुन लिपीक श्रीमती कमल तुडमे यांना भेटुन त्यांना माझे 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कमेच्या बिलावर कार्यालयीन टिपन टाकुन माझी फाईल लेखापाल यांचेकडे पाठविण्याची विनंती केली. तेव्हा त्यांनी माझे कडे 5000/- रूपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना पैसे देण्यास नकार दिला. तेव्हा त्या मला म्हणाल्या की, तुमच्या बिलावर कार्यालयीन टिपन टाकुन फाईल लेखापाल यांचेकडे पाठवणार नाही असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना नाईलाजास्तव 3500/- रूपये दिले. त्यानंतर त्यांनी मला बाकीचे 1500/- रूपये बिलाची रक्कम जमा झाल्यानंतर आणुन देण्यास सांगीतले. त्यानंतर दिनांक 12/08/2022 रोजी माझे 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम माझे बक खात्यावर जमा झाली. त्यानंतर मी दिनांक 15/08/2022 रोजी झेंडा वंदानासाठी नगरपरिषद बिलोली येथे गेलो. तेव्हा नगरपरिषद बिलोली येथील लिपीक श्रीमती कमल तुडमे मडम यांनी माझी भेट घेवुन मला म्हणाले की, मी तुमच्या 7 व्या वेतन आयोगाच्या वेतनाच्या फरकाच्या बिलावर कार्यालयीन टिपनी टाकल्यामुळे तुमचे दिनांक 12/08/2022 रोजी पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे तुम्ही बाकीचे 1500/- रूपये मला दया असे म्हणुन माझे कडे लाचेची मागणी केली. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यामुळे मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नाहीत असे म्हणुन नंतर पैसे आणुन देतो असे म्हणुन तिथुन निघुन गेलो. त्यानंतर मला होणारे लाच मागणी बाबत मी दिनांक 17/08/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथे तक्रार देवुन नगरपरिषद बिलोली जि.नांदेड येथील लिपीक श्रीमती कमल तुडमे मडम यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करणे बाबत विनंती केली. मी दिलेल्या तक्रारीवरुन आज दिनांक 18/08/2022 रोजी दुपारी 12.45 वा चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथील पो.नि.श्री नानासाहेब कदम व दोन शासकीय पंचासह, सापळा पथक असे दगडापुर येथील महादेव मंदिर येथे आले. त्यानंतर पो.नि.श्री नानासाहेब कदम यांनी माझी व दोन्ही शासकीय पंचाची तसेच सापळा पथकातील सदस्याची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची माहिती दोन्ही पंचाना तोंडी सांगीतली. तसेच माझी दिनांक 17/08/2022 रोजी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचानी वाचुन खात्री केली. त्यानंतर पो.नि.नानासाहेब कदम, दोन्ही पंच व माझे परिचयदर्शक वक्तव्य व्हाईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करून घेतले. त्यानंतर मला तसेच पंच क्र.1 भाऊसाहेब शिंदे, पंच क्र.2 श्रीमती खमरुनिसा रुबी फौज मुर्तूजा व सापळा पथकातील सदस्यानां लाचमागणी पडताळणी अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.श्री.नानासाहेब कदम यांचे सुचने प्रमाणे पोक जाधव यांनी माझेकडे व्हाईस रेकर्डर चालु करून देवुन

माझे सोबत पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे यांना देवुन मला नगरपरिषद बिलोली येथील लिपीक श्रीमती कमल तुडमे यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी 13.35 वाजता रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे असे आम्ही दोघेजन दगडापुर महादेव मंदिर येथुन माझे चार चाकी वाहनाने रवाना होवुन नगरपरिषद बिलोली येथे जावुन लिपीक श्रीमती कमल तुडमे मडम यांची त्यांचे कक्षात भेट घेतली. तेव्हा श्रीमती कमल तुडमे मडम यांनी माझे 7 व्या वेतना आयोगाच्या फराकाच्या बिलाचे काम केले आहे असे म्हणुन यापुर्वी तुम्ही 3500/- रुपये दिले असुन बाकीचे राहीलेले दीड हजार रुपये दया असे म्हणुन माझेकडे पंचासमक्ष 1500/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना अर्धा - एक तासात घरी जावुन घेवुन येतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे असे आम्ही दोघेजण मिळुन माझे चार चाकी वाहनाने दगडापुर महादेव मंदिर येथे 14.05 वाजता दरम्यान परत पोहचलो. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर माझे जवळील व्हाईस रेकर्डर बंद करून पो.नि.श्री.नानासाहेब कदम यांनी पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे व माझेकडे विचारपुस केली. त्यानंतर दोन्ही पंच व माझे समक्ष लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकर्डर मध्ये रेकर्ड झालेले संभाषण ऐकुन त्यात लिपीक श्रीमती कमल तुडमे मडम यांनी माझे 7 व्या वेतना आयोगाच्या फराकाच्या बिलाचे काम केले म्हणुन माझेकडुन यापुर्वी 3500/- रुपये स्विकारल्याचे मान्य करून आज रोजी माझेकडे बक्षीस स्वरूपात 1500/- रुपये लाचेची मागणी केले असल्याची खात्री केली. त्यानंतर पो.नि.श्री.नानासाहेब कदम यांनी मला 1500/- रुपये हजर करण्यास सांगीतले त्यावेळी मी माझे कडील 1500/- रुपये ज्यात पाचषे रुपये दराच्या तीन चालनी नोटा हजर केल्या असता ते पो.नि.श्री. नानासाहेब कदम यांनी पंचासमक्ष ताब्यात घेवून पंच क्र.2 श्रीमती खमरूनिसा रूबी फैज मुर्तूजा यांचे करवी सदर नोटांचे वर्णन व क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर शासकीय वाहनात मला तसेच दोन्ही पंचाना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या पाचषे रुपये दराच्या तीन चलनी नोटास अँन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे शर्टच्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर सापळा कार्यावाही अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांनी कोणी काय करावे या बाबत सविस्तर सुचना दिल्या. तसेच मला लिपीक श्रीमती कमल तुडमे यांनी लाच स्विकारल्यानंतर करावायाचा ईशारा समजावुन सांगुन सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर माझे चार चाकी वाहनात मी, पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे व पोक ईश्वर जाधव असे व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहनाने एका पाठोपाठ दगडापुर महादेव मंदिर येथुन निघुन बिलोली नगरपरिषद जवळ पोहचल्यानंतर पोक ईश्वर जाधव यांनी सर्व सापळा पथक शासकीय वाहनातुन निघुन बिलोली नगरपरिषद जवळ पोहचल्याची खात्री करून पो.नि.श्री.नानासाहेब कदम यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकर्डर चालु करून देवुन ते माझे कार मधुन उतरले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे आम्ही दोघजन मिळुन नगरपरिषद बिलोली येथे जावुन लिपीक श्रीमती कमल तुडमे यांची भेट घेवुन त्यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान मागणी केल्या प्रमाणे माझे जवळील अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम माझे शर्टच्या खिशातुन काढुन समोर धरली. तेव्हा त्यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम पंच क्र.1 श्री.भाऊसाहेब शिंदे यांचे समक्ष स्विकारली. त्यानंतर सापळा पथकास लाच स्विकृती बाबतचा ईशारा मिळताच सर्व सापळा पथक सतर्क होवुन लिपीक श्रीमती कमल तुडमे यांना ताब्यात घेतले व लिपीक श्रीमती कमल तुडमे यांचेकडून पो.नि.श्री.नानासाहेब कदम यांनी मी दिलेले 1500/- रुपये रुपये पंचा समक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना त्यांचे संपुर्ण नांव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव सौ.कमल पिराजी तुडमे, वय 47 वर्षे, व्यवसाय नौकरी पद लिपीक, नेमणुक नगरपरिषद बिलोली ता.बिलोली जि.नांदेड रा.नाईकवाडी गल्ली, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड असे सांगीतले.तरी दिनांक 18/08/2022 रोजी वेळ दुपारी 14.46 ते 14.56 वा चे दरम्यान नगरपरिषद बिलोली, जि.नांदेड येथील हल मधील लिपीक श्रीमती कमल तुडमे यांचे कक्षात पंचासमक्ष मला माझे 7 व्या वेतन आयोगाच्या वेतनाचे फरकाच्या रक्कमेच्या बिलाचे काम करून देण्यासाठी माझेकडुन यापुर्वी 3500/- रुपये स्विकारल्याचे मान्य करून, माझे 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या बिलाचे काम करून दिल्याचा मोबदला म्हणुन बक्षीस स्वरूपात आज रोजी पंचासमक्ष राहीलेले 1500/- रुपयांची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान 1500/- रुपये लाचेची रक्कम त्यांनी स्वतः स्विकारली म्हणुन माझी श्रीमती कमल पिराजी तुडमे, वय 47 वर्षे, व्यवसाय नौकरी पद लिपीक, नेमणुक नगरपरिषद बिलोली ता.बिलोली जि.नांदेड रा.नाईकवाडी गल्ली, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड याचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्षही फिर्याद दिली सही

**13.Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Shivaji Anna Doifode(I (Inspector)) / pobn60971 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन बिलोली

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** Shivaji Anna Doifode
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pobn60971